माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/४२/२०१९
दि.१५/०४/२०१९.

0/C

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ...............अपिलार्थी
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
विभागप्रमुख (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांचेकडे दि.१४/०२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

a) Certified copy of daily programs support and note sheet indicating notings by various officials & decisions of correspondent authority on the letter forwarded to you from udd.

b) Certified copies of letters, directions./ or instructions issued to concerned authority/ subordinate office on support or feedback on the above mentioned letter (Copy enclosed)

c) Name of officer and contact no. of officers responsible to take action the above mentioned letter.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत जाणूनबुजून माहिती दिली नसुन तसेच माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने अपिलार्थी यांनी दि.२६/०३/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./५६/२०१९ दि.०४/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ कामी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.कर/६८/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

Scanned by CamScanner

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) हे सुनावणीस उपस्थित आहेत व अपिलार्थी अर्जदारास सुनावणीस अनुपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१४/०२/२०१९ रोजीच्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी हे जाणून बुजून आम्हाला माहिती देण्यास टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने अजून पर्यंत माझ्या माहिती अधिकाराच्या अर्जावर त्यांनी उत्तर दिलेले नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अजून पर्यंत माहिती का उपलब्ध करुन दिली नाही याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात यावा. जाणीवपुर्वक माहिती लपवतात म्हणून त्यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करावी.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांनी विहीत मुदतीत माहिती दिलेली नाही. सबब जनमाहिती अधिकारी यांनी 07 दिवसांच्या आत अपिलार्थी अर्जदारास माहिती विनाशुल्क पुरवावी. तसेच यानंतर माहिती अधिकारावरील प्रत्येक अर्जावर विहीत वेळेत दक्षता घेण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (सा.प्र.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

O/C कृष्णा गुप्ता

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (सा.प्र.)

15/4/2019

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner